# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे**
**फोन.नं. ०२२-२९४५१००१**
**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र १०५** **दिनांक- १७/०४/२०२१**

## कोविड प्रादुर्भावाच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयामध्ये 'ई भेट' सुविधा कार्यान्वित.

महाराष्ट्र शासनाने कोविड प्रादुर्भावाच्या अनुषंगाने "ब्रेक द चेन" अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार नागरिकांची प्रत्यक्ष भेट टाळून त्यांना 'ई भेट'च्या माध्यमाने संपर्क करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार नागरिकांना त्यांच्या अडीअडचणी, तक्रारी वरिष्ठ अधिका-यांपर्यंत पोहचविण्याकरीता एक माध्यम उपलब्ध करणे गरजेचे होते. याकरिता मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये सोमवार दिनांक १९/०४/२०२१ पासुन 'ई भेट'सुविधा कार्यान्वित करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत सुरु करण्यात आलेल्या या सुविधेनुसार नागरिकांनी त्यांच्या समस्या व तक्रारींचा तपशील तसेच विनंती या कार्यालयाचे वॉटस्‌ॲप नंबर **8591336698** किंवा ई-मेल **cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in यावर पाठवाव्यात.** नागरिकांना कोणत्या वेळेत व कोणत्या दिवशी ई भेट/संभाषण करू ईच्छितात हे आगाऊ कळवावे. त्यांना ऑनलाईन भेटीं करीता दिनांक व वेळ तसेच ई-भेटीचे संवाद माध्यम उपलब्ध करून देण्यात येईल.

पोलीस आयुक्त व आयुक्तालयातील इतर वरिष्ठ अधिकारी हे नागरिकांच्या अडीअडचणी, तक्रारी, विनंती ऐकण्यासाठी कार्यालयाचे कामकाजाचे दिवशी दुपारी ०३:०० ते ०५:००'ई-भेट'च्या माध्यमातून ऑनलाइन उपलब्ध राहतील. तसेच पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदारांच्या अडीअडचणीचे निवारन करण्यासाठी ई-भेट/ऑनलाईन संभाषन दिनांक २३/०४/२०२१ पासुन प्रत्येक शुक्रवारी सकाळच्या सत्रामध्ये आयोजित करण्यात येईल.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोविडचे पार्श्वभूमीवर अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडु नये. आपल्याला पोलीस विभागासंबंधी काही अडीअडचणी, तक्रार अथवा सुचना असल्यास पोलीस आयुक्त यांना भेटण्यासाठी ई-भेट या संपर्क सुविधेचा वापर करावा.